# ई - पोलीस पत्रिका

दिनांक २०/०१/२०२५ अनु.क्र. १४

### (अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/आंजिब कार्यमुक्त/पोलीस अंमलदार/२१४/२०२५ अमरावती शहर दिनांक ०८/०१/२०२५**

**संदर्भ :**-१. या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/आं.जि.ब. प्रस्ताव/९८०८/२०२३ दि.२५/०८/२०२३
२.पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे पत्र क्र.पोअय/कक्ष-९/आंजिब- स्विकृती /२२४२४/२०२४ दि.२४.१२.२०२४

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा त्यांच्या विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक, यवतमाळ घटकास पाठविण्यात आलेलाहोता. त्याअनुषंगाने संदर्भाधिन पत्रानुसारखालील नमुद पोलीस अंमलदार यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी पोलीस शिपाई या पदावर व त्यांचे नावासमोर नमुद प्रवर्गात आंतरजिल्हा बदलीवर घेण्यास स्विकृती दिलेली आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई तेसहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीसकर्मचाऱ्यांच्या घटक आस्थापना बदली नियमावली सन २०१७मधील परि.क्र.४.(i) अन्वये प्रदानकरण्यात आलेल्या प्राधिकारानुसारखालील नमुद पोलीस अंमलदार यांचीत्यांचे नावासमोर दर्शविलेल्या घटकात आंतरजिल्हा बदली करण्यात येत असून, त्यांना बदलीवर हजरहोणेकरीता**दि.१०.०१.२०२५ रोजी मा.नंतर**कार्यमुक्तकरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे पदनाम, ब.क्र. व नाव | नेमणुक | स्विकृतीचा प्रवर्ग | बदलीकरीता स्विकृती प्राप्त पद | आंतरजिल्हा बदलीचे घटक |
|---|---|---|---|---|---|
| १. | मपोशि/४०२ आरती सुरेशराव ठाकुर | पो.स्टे.राजापेठ | **खुला** | **पोलीस शिपाई** | पो.अ.यवतमाळ |
| २. | पोशि/२५८ आकाश मधुसुदनहमद | दंगा नियंत्रण पथक अमरावती शहर | **भज-ड** | **पोलीस शिपाई** | पो.अ.यवतमाळ |

सदर आंतरजिल्हा बदली ही विनंतीनुसार करण्यात येत असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी व स्थांनातर भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. नमुद पोलीस अंमलदार यांना देण्यात आलेला शासकीयसंरजाम, ओळखपत्र, कुटूंब आरोग्य योजनेचे ओळखपत्र इत्यादीसाहित्य भांडारपाल,

पोलीसमुख्यालय, अमरावती शहर यांचेकडे जमा करावे. तसेचसदर पोलीस अंमलदारांच्या ताब्यात निवासस्थान असल्यास त्याबाबतच्या प्रलंबित देयकांचा भरणा (विद्यूत बिल, पाणी बिल इ.)करून घेवून निवासस्थान व्यवस्थित असल्याचीखात्रीकेल्यानंतरच संबधीत पोलीसठाणे/शाखा प्रमुख यांनी संबधीतास आंतरजिल्हा बदलीवर कार्यमुक्त करावे.

**२.पोआअ/आस्था-१/आंजिब हजर-पो.आ.नागपुर/४६० /२०२५ अमरावती शहर दिनांक १५/०१/२०२५**

संदर्भ :- (१) या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/आंजिब-स्विकृती/१६०९४ धारपवार/ १०३२०/२०२४, दि.०२.१२.२०२४

(२) पोलीस आयुक्त,नागपुर यांचे आदेशक्र.पोआना/आस्था/सआली-२/कार्यमुक्त आंजिब/२०२४ दि.१०/०१/२०२५

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे संदर्भीय क्र.१ अन्वये आंतरजिल्हा बदली अंतर्गत विनंतीवरुन पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे स्विकृती देण्यात आली आहे. त्याअनुषंगानेपोलीस आयुक्त,नागपुरयांनीत्यांचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना बदलीवर हजरहोण्यास दिनांक ११/०१/२०२५ चे मा.नंतरकार्यमुक्तकरण्यात आले असल्यानेसदर पोलीस शिपाई बदलीवर हजरहोण्यास आल्याने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पोलीस शिपाई पदावर या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येत असुनत्यांची नेमणुकत्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदाराचे पदनाम/ ब.क्र. व संपुर्ण नाव | मुळ घटक | कार्यमुक्तकेल्याचा दिनांक | या घटकातहजर झाल्याचा दिनांक | स्विकृतीचे पद व प्रवर्ग | देण्यात आलेला नविन ब.क्र. | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि/१६०९४ किशोर महादेवराव धारपवार | पोलीस आयुक्त,नागपुर | ११/०१/२०२५ मा.नंतर | १३/०१/२०२५ मा.नंतर | पोलीस शिपाई खुला (होमगार्ड) | **११३४** | **पोलीस मुख्यालय अमरावती शहर** |

वर नमुद पोलीस अंमलदारहे आंतरजिल्हा बदली अंतर्गत बदलुन आल्यानेत्यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र.संकिर्ण १०१७/३८४३/प्र.क्र. ४६९/पोल-५ दिनांक २६.१०.२०१७ मधीलतरतुदीनुसार वरील पोलीस शिपाई यांची सेवा जेष्ठता त्याच्या भरती वर्षात अमरावती शहर आस्थापनेवर सेवाजेष्ठतेने सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचेखाली निश्चित करण्यात येईल.

वर नमुद पोलीस शिपाई यांनी प्रथम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आमद देवुन तेथे शासकियसंरजाम घ्यावा व नंतर नेमणुकीच्या ठिकाणीहजर व्हावेत.

**३.पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/३१५/२०२५ अमरावती शहर दिनांक १०/०१/२०२५**

**संदर्भ** :- १) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक :- पोमसं/३/अधिसूचना/१४/२०१४ /७३ दिनांक २५/०२/२०१५
२) महाराष्ट्रपोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेशक्रमांक २, दिनांक १६/०२/२०१५
३) महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन परिपत्रकक्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०१ जुलै २०१५
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.२९/कार्या.१२ दि.२७.५.२०२२

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमुदकेल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश-२०१५, मधीलकलम २२ न च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन नमुद**पोलीस अंमलदार**यांची विनंती वरुन नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणेसांगोपांग विचार करुन **मुदतपुर्वबदली (पदस्थापना)** करण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | बक्कल क्रमांक | पोलीसअंमलदाराचे नाव | नेमणुकीचेठिकाण | नविन बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि | ४८७ | रोशन रामरावजी महिंगे | पोलीस मुख्यालय | बीडीडीएस |

**४.पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/५२५/२०२५ अमरावती शहर दिनांक १७/०१/२०२५**

**संदर्भ** :-१) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक :- पोमसं/३/अधिसूचना/१४/२०१४ /७३ दिनांक २५/०२/२०१५
२) महाराष्ट्रपोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेशक्रमांक २, दिनांक १६/०२/२०१५
३) महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन परिपत्रकक्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०१ जुलै २०१५
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.२९/कार्या.१२ दि.२७.५.२०२२

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमुदकेल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश-२०१५, मधीलकलम २२ न च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन नमुद **पोलीस अंमलदार**यांची विनंती वरुन नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणेसांगोपांग विचार करुन **मुदतपुर्वबदली (पदस्थापना)** करण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | बक्कल क्रमांक | पोलीसअंमलदाराचे नाव | नेमणुकीचेठिकाण | नविन बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि | ५१० | दिपक उत्तम आत्राम | पोलीस मुख्यालय | पो.स्टे.नांदगाव पेठ |

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/परि.पोउपनि/ सत्र क्र. १२४/१११५१/२०२४ अमरावती शहर दि. २४ /१२ /२०२४**

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे पत्र क्र. मपोअ/प्रशि-४/जि.प्रा.प्र. कार्यमुक्ती आदेश /सत्र क्र.१२४/९६५१/२०२४, दिनांक २०/१२/२०२४

**विषय :-**परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक यांचे बारा महिन्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणाबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये अन्वये सत्र क्र. १२४ मधील खालील परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यांना अमरावती शहर येथे प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता वाटप करण्यात आले असून ते त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास या कार्यालयाचे आस्थापनेवर प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता हजर झाले आहेत.

परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यांचा प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१, परिशिष्ट-११ (नियम १२६) अन्वये खालील प्रमाणे तयार करण्यात आला असून खालील नमुद परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक यांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पुढील आदेशापर्यंत, तात्पुरत्या स्वरुपातनेमणूक करण्यात येत आहे. नेमणूकीचे ठिकाणी तात्काळ हजर राहून प्रात्यक्षिक प्रशिक्षण पुर्ण करावे.

| अ.क्र. | परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव | प्रात्यक्षिक प्रशिक्षणास हजर झाल्याचा दिनांक | प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अनिता अशोक हुलावळे | दि. २३.१२.२०२४ म. पूर्व | पो.स्टे. खोलापुरी गेट |
| २ | तेजल सुनिल शिंदे | | पो.स्टे. नागपुरी गेट |
| ३ | विपुल निवृत्ती हुलावळे | | पो.स्टे. राजापेठ |
| ४ | वैभव नाना काळबांडे | | पो.स्टे. फ्रेजरपुरा |
| ५ | अर्जुन सुभाष राजारपल्लू | | पो.स्टे. फ्रेजरपुरा |
| ६ | सुषमा भिमराव मांडवकर | | पो.स्टे. बडनेरा |
| ७ | आशिष अनिल दौंड | | पो.स्टे. गाडगेनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | सोनाली रमेश सोनावणे | | पो.स्टे. गाडगेनगर |
| ९ | रोशन कल्याणराव चटे | | पो.स्टे. राजापेठ |
| १० | प्रशांत नागनाथ पारधी | | पो.स्टे. नागपुरी गेट |
| ११ | नितीन अशोक करंडे | | पो.स्टे. नांदगाव पेठ |
| १२ | अनिकेत तुकाराम वाघ | | पो.स्टे. कोतवाली |
| १३ | चरणसिंग गणेश राजपुत | | पो.स्टे. गाडगेनगर |
| १४ | वैभव पांडुरंग वंजारे | | पो.स्टे. खोलापुरी गेट |
| १५ | शरयु विजय उबाळे | | पो.स्टे. सीटी कोतवाली |

वरिल परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक यांचा एक ते बारा महिन्याचा प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१ परिशिष्ट-११ (नियम १२६) अन्वये दिनांक २३/१२/२०२४ पासून खालीलप्रमाणे राहिल.

१) पहिला महिना - दिनांक २३/१२/२०२४ ते २२/०१/२०२५

सदर कालावधीत ते पहिल्या महीन्यामध्ये पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार लेखनिक म्हणून काम करतील, कर्तव्य नोंदवही, आठवडा डायरी आणि इतर पोलीस ठाणे अभिलेख, माहितीपत्रके आणि कर्मचाऱ्यांची प्रवासभत्ता बिले तयार करतील ईत्यादीसह पोलीस ठाण्याचे लेखाकार्य, पोलीस आणि गुन्हेगार गुप्तवार्ता राजपत्रे आणि तक्रारी घेणे व त्यांची निर्गती यावर विशेष लक्ष देतील.

२) दुसरा महिना- दिनांक २३/०१/२०२५ ते २२/०२/२०२५

गुन्हे प्रतिबंध, निगरानी आणि वाईट चालीच्या इसमांकडून वापरल्या जाणाऱ्या जागा, हॉटेल, धर्मशाळा आणि बाजारासह सार्वजनिक ठिकाणांचे चेकींग, आणि गुन्हे व गुन्हेगार याबाबत गुप्तवार्ता मिळविणे ईत्यादीबाबतची कर्तव्ये शिकण्यासाठी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस उपनिरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकांना वारंवार बाहेरील कर्तव्यावर नेमतील.

३) तिसरा आणि चौथा महिना - दिनांक २३/०२/२०२५ ते २२/०४/२०२५

इनक्वेस्ट आणि किमान सहा प्रकरणांचा तपास करण्यासाठी अधिकाऱ्यास ग्रामिण पोलीस ठाण्यात प्रभारी म्हणून नेमावे. शास्त्रीय तपासणी साठी दुवे कसे करावे आणि स्वतंत्रपणे प्रकरण दैनंदिनी कशी लिहावी हे परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक शिकतील. त्यांनी किमान दोन प्रकरणांच्या चौकशीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या सोबत गेले पाहीजे. आणि त्यांच्या एक तपासणीच्या वेळी हजर राहिले पाहीजे. आणि जमाव नियंत्रण आणि जमान विसर्जनासाठी केली जाणारी पोलीस व्यवस्था पाहीली पाहिजे. राजकारणी,

वार्ताहर, पंचायत सदस्य आणि स्थानिक लोकांशी परिचय करुन त्यांनी जनसंपर्काच्या कामात पुढाकार घेतला पाहिजे आणि मनुष्य व्यवस्थापनाशी संबंधीत बाबीमधील योग्य दृष्टीकोनाचा ( Attitude ) विकास, सामाजिक कायदेमंडळाबाबत पोलीसांची भुमिका आणि अहवाल लेखनाची कला या बाबीवर विशेष लक्ष देतील.

४) पाचवा महिना - दिनांक २३/०४/२०२५ ते २२/०५/२०२५

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक हे नेमणुकीस असलेल्या पो.स्टे. च्या पोलीस अभियोक्ता हयांचे कडे संलग्न राहतील. परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक कार्यालयीन काम, चालानाची छाननी कशी करावी आणि खटल्याचे संक्षिप्त टाचण (Brief ) कसे तयार करावे ईत्यादी बाबी शिकतील आणि एका सेशन केसचे प्रथम पासून शेवट पर्यंत कामकाज पाहण्यासाठी पोलीस अभियोक्ता यांच्या बरोबर जातील. कामकाजामध्ये साक्षीदारांची उलटतपासणी आणि अभियोग व बचाव पक्षाच्या वकीलाचा युक्तीवाद यांचा अंतर्भाव असावा. परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकांना तुरुंगातील अनोळखी कैदयांच्या मुलाखतीसाठी नेले पाहिजे आणि पुर्व शिक्षा कशा शोधल्या जातात याची माहिती देण्यात यावी.

५) सहावा महिना - दिनांक २३/०५/२०२५ ते २२/०६/२०२५

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक हे खालीलप्रमाणे प्रशिक्षण घेतील.

१) दि. २३/०५/२०२५ ते ०१/०६/२०२५ पर्यंत १० दिवस विशेष शाखेतील गोपनिय फाईल, बंदोबस्त आखणी इत्यादी बाबत प्रशिक्षण घेतील.

२) दिनांक ०२/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ पर्यंत ११ दिवस गुन्हेशाखेत संलग्न राहतील. त्यांना गुन्हे शाखेमध्ये चालत असलेल्या आंतरजिल्हा/ आंतराज्य व जिल्हयातील गुन्हेगारांची माहिती करुन देण्यात येईल. तसेच आर्थिक गुन्हे शाखेत चालत असलेल्या कामकाजाचे प्रशिक्षण घेतील.

३) दिनांक १३/०६/२०२५ ते २२/०६/२०२५ पर्यंत १० दिवस महीला सेल येथे चालत असलेल्या कामकाजाचे प्रशिक्षण घेतील.

६) सातवा आणि आठवा महिना - दिनांक २३/०६/२०२५ ते २२/०८/२०२५

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक हे पूर्वीच्या पोलीस स्टेशनला संलग्न राहतील. या कालावधीमध्ये ते कनिष्ठ पोलीस उपनिरीक्षक व जादा तपासणी अंमलदार म्हणून काम पाहतील. तसेच गुन्हयाचा सखोलपणे तपास करुन पो.स्टे. चे निरनिराळया कामाची माहिती करुन घेतील.

७) नववा आणि दहावा महिना - दिनांक २३/०८/२०२५ ते २२/१०/२०२५

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक हे त्यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता नेमून दिलेल्या पोलीस स्टेशनला संलग्न राहतील. तसेच प्रशिक्षणाचे कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक तपासीक अंमलदार म्हणून काम पाहणे, रात्रीची गस्त घालणे, बीट डयुटीवर देखरेख ठेवणे,

रहदारीशी संलग्न कामे व वाहतुकीबाबतच्या कामाची माहिती करुन घेणे, सराफा (ज्वेलरी बाजार ) चेकिंग करणे, कायदा व सुव्यवस्था तसेच औद्यागिक समस्या हाताळणे, आणि पांढरपेशे गून्हेगार, तस्कर इत्यादी इसमांना कसे हाताळावे या कामात सहभाग घेतील. जेथे सुधारणा संस्था असतील त्या ठिकाणी भेटी देतील.

.

८) अकरावा महिना - दिनांक २३/१०/२०२५ ते २२/११/२०२५

हया कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक हे पोलीस आयुक्त यांचे वाचक फौजदार म्हणून कार्य करण्यासाठी नियुक्ती, शाखेमध्ये चालणाऱ्या कामकाजाची माहिती करुन घेतील तसेच पोलीस मुख्यालयाला होणाऱ्या परेडला हजर राहतील. तसेच जिल्हा राखीव लाईन व बिनतारी संचाच्या कामकाजाचा अभ्यास करतील.

९) बारावा महिना - दिनांक २३/११/२०२५ ते २२/१२/२०२५

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक हे त्यांना नेमून देण्यात आलेल्या राज्य राखीव पोलीस बल गट मध्ये प्रशिक्षणाकरीता हजर राहून जमाव नियंत्रण, जमाव विसर्जन, दरोडा प्रतिबंधक कारवाई आणि हिंसेचा समावेश असलेल्या हालचाली या विशेष संदर्भासह सशस्त्र पोलीसांचे कामकाज शिकतील.

महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१ परिशिष्ट-११ नियम १२६ नुसार १२ महिन्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा कार्यक्रमानुसार संबंधीत ठाणेदारांनी त्यांचे पो.स्टेला नेमणूक करण्यात आलेल्या परि. पोलीस उपनिरीक्षक यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देवून, प्रशिक्षण देण्यात आल्याचा दरमहा मासिक अहवाल संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांचे मार्फतीने न चुकता या कार्यालयास सादर करावा.

**२.पोआअ/पशा-१/प्रशि./CPR/Women Safety/४२५/२०२५ अमरावती शहर दिनांक १५/०१/२०२५**

## आदेश

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके म. रा. मुंबई यांचे यांचे पत्र जा. क्र. पोमसं /प्रशि-२/आर्थिकगुन्ह्याचा तपास /६५/२०२४/३८ दिनांक ०७.०१.२०२५

**विषय :-** वुमन सेफ्टी ( Women Safety) या विषयावर ०५ दिवसीय प्रशिक्षण सत्र पोलीस संशोधनकेंद्र, पुणे येथे आयोजित केल्याबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, पोलीस संशोधन केद्र, पुणे येथे दि. २०.०१.२०२५ ते २४.०१.२०२५या कालावधीमध्ये वुमन सेफ्टी (Women Safety)या विषयाचे प्रशिक्षणसत्र आयोजित करण्यात आलेले आहे.सदरचे प्रशिक्षणाकरीता अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद पोलीस अधिकारी यांचीनिवड करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | पोलीस घटकाचे नांव | सद्याची नेमणुक | मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.जितेंद्र भार्गव | पोलीस उपनिरीक्षक | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पो. स्टे. नागपूरीगेट | ९०४९६०७९७० |
| ०२ | श्री. विकास मनपिया | पोलीस उपनिरीक्षक | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पो. स्टे. राजापेठ | ९५१८५१४५६४ |

**प्रशिक्षणकेंद्रात जाण्यापुर्वी त्या बाबतचे नियम व अटीखालील प्रमाणे :-**

१.प्रशिक्षणास साध्या कपड्यात(Plain Cloths) उपस्थित राहावे, प्रशिक्षणकाळात जीन्स/टि-शर्ट परिधान करु नये.

२. सी.पी.आर. पुणे येथे लॉन टेनिस, स्विमींग पुल या सुविधा उपलब्ध असुन त्यांचा वापर करावयाचा असल्यास आवश्यक किट सोबत न्यावी.

३. प्रशिक्षणाकरीता फक्त प्रशिक्षणार्थींनी उपस्थित राहावे. सोबत पती/पत्नी किंवा लहान मुलांना घेवुन जावु नये.तसेच वाहनचालक/सुरक्षासहायक यांची व्यवस्था केली जाणार नाही.

४. प्रशिक्षणार्थी अधिकारी यांनी दि. १९/०१/२०२५ रोजी २१.०० वाजता प्रशिक्षणस्थळी पोहचावे.

## रजा

**१.पोआअ/पशा-१/अर्जित रजा/पो.अधि./१११५५/२०२४ अमरावती शहर दिनांक २४/१२/२०२४**

### आदेश

अमरावती शहर पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जित रजा मुख्यालय सोडण्याची परवानगीसह मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण/ पो. स्टे | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. महेश इंगोले, सहायक पोलीस निरीक्षक | गुन्हे शाखा | अर्जित रजा | दि. २७.१२.२०२४ ते ०५.०१.२०२५ पर्यंत १० दिवस, | श्री. संजय वानखडे, श्रेणी पोउपनि, गुन्हे शाखा |

**२.पोआअ/पशा-१/राज पोलीस अधिकारी/४९१/२०२५ अमरावती शहर दिनांक १६/०१/२०२५**

### आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातीलखालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत मुख्यालय सोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण/ पो. स्टे | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. कैलास पुंडकर, सहायक पोलीस आयुक्त | सहा. पोलीस आयुक्त- फ्रेजरपूरा विभाग | मुख्यालयस ोडण्याची परवानगी | दि. १९.०१.२०२५ (रविवार) रोजीच्या शासकियसुट्टीचे दिवशी तसेच दि. १८.०१.२०२५ रोजीकार्यालयीन वेळेनंतर सांयकाळी मुख्यालयसोडण्याची परवानगी | श्री. अरुण पाटील, सहायक पोलीस आयुक्त- गाडगेनगर विभाग |

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/नवप्रवि.पो.शि.६६५ औताडे/५२७/२०२५अमरावती शहरदिनांक १७/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद नवप्रविष्ठ प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदारहे पोलीस मुख्यालय, अमरावती श्हर येथे नेमणुकीस असुन दि. ०१/०१/२०२४ ते दि.३०/०१/२०२४ पर्यंत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिलेअसल्याने कसुरी अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला आहे. तरीतुमच्या आजाराच्या कारणास्तव सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार खालील नमुद केल्या प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यातकसुरी | गैरहजर कालावधी | प्राधिकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | नवप्रवि.पो. प्रशि./ ६६५ किशोर औताडे | पो.मुख्या, अम.शहर | दिनांक ०९/०१/२०२४ ते दिनांक ३०/०१/२०२४ पर्यत गैरहजर राहिले. | दिनांक ०९/०१/२०२४ ते दिनांक२०/०१/२०२४ पर्यत एकुण १२ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| | | | | दि.२१/०१/२०२४ ते दि.३०/०१/२०२४ पर्यंत एकुण १० दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ५० नुसार** |

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१. पोआअ/प्रलि.पशा/वि.अ./परवानगी/५१३/२०२५ अमरावती दिनांक १७/०१/२०२५**

**संदर्भ :-** आपला दिनांक ०३/१२/२०२४ चा विनंती अर्ज

**विषय :-** खाजगी सिव्हील प्रॅक्टीसकरण्याची परवानगी देणेबाबत.
श्रीमती.सारिका भोंगाडे, विधी अधिकारी.

---००---

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपण श्रीमती सारिका भोंगाडे, विधी अधिकारी, नेमणुक सहा. पोलीस आयुक्त कार्यालय, फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे या कार्यालयाचे आदेश दिनांक ०३/०७/२०२४ पासुन एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने निव्वळ ११ महिन्यांकरीताकंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात विधी अधिकारी या पदावर नेमणुकीस असुन आपण संदर्भीय अर्जान्वये सिव्हील प्रॅक्टीस करण्याची परवानगी मिळणे बाबत विनंती केली आहे.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/ पोल-१० दिनांक १५/०९/२००६ मधीलकरारनाम्यातीलतरतूदी आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे परिपत्रक क्रमांक : प्रशि/पोभ/विअ/२००६/४३६० दिनांक २६/१०/२००६ मधील तरतूदी नुसार तसेच खालील नमुद अटी व शर्तीवर वकिली व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(१) आपण आपल्या खाजगी वकिली व्यवसायात अतिव्यस्त नसेल आणि पोलीस विभागास कायदे विषयक व प्रशासकीय न्यायालयीन प्रकरणी कामकाजाबाबत सल्ला देण्यासाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक राहिल.

(२) प्रत्येक आठवडयात सल्ला देण्यासाठीकमीतकमी ३० तासांचा कालावधी दिला पाहिजे.

(३) आपण शासनाविरुध्द फौजदारी स्वरुपाचे प्रकरणहाताळणार नाही.

**२. पोआअ/प्रलि.पशा/वि.अ. गट-ब/परवानगी/५११/२०२५ अमरावती दिनांक १७/०१/२०२५**

संदर्भ :- आपला दिनांक २६/१२/२०२४ चा विनंती अर्ज

विषय :- नोटरी व्यवसाय करण्याचीपरवानगी देणेबाबत.
श्री.अतुल विखार, विधी अधिकारी, गट -ब.

---००---

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येतेकी, आपण श्री. अतुल विखार, विधी अधिकारी, गट -ब, नेमणुक पोलीस आयुक्तकार्यालय, अमरावती शहर येथे या कार्यालयाचे आदेश दिनांक ०३/०७/२०२४ पासुन एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने निव्वळ ११ महिन्यांकरीताकंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात विधी अधिकारी , गट ब या पदावर नेमणुकीस असुन आपण संदर्भीय अर्जान्वये भारत सरकारने दिनांक ०६/१२/२०२४ अन्वये जारी केलेल्या प्रमाणपत्रानुसार नोटरी व्यवसाय करण्याचीपरवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/ पोल-१० दिनांक १५/०९/२००६ मधीलकरारनाम्यातीलतरतूदी आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे परिपत्रकक्रमांक : प्रशि/पोभ/विअ/२००६/४३६० दिनांक २६/१०/२००६ मधीलतरतूदीनुसारतसेचखालील नमुद अटी व शर्तीवर नोटरी व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(१) आपण आपल्या नोटरी व्यवसायात अतिव्यस्त नसेल आणि पोलीस विभागास कायदे विषयक व प्रशासकीय न्यायालयीन प्रकरणी कामकाजाबाबत सल्ला देण्यासाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक राहिल.

(२) प्रत्येक आठवडयात सल्ला देण्यासाठीकमीतकमी ३० तासांचा कालावधी दिला पाहिजे.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस